# उमेद- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

महाराष्ट्र शासन

**ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन**

**जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, गोंदिया**

उमेद

क्षितिज नवा, विश्वास नवा...

## जिल्हा व तालुका अभियान व्यवस्थापन कक्षात विविध पदे भरण्यासाठी जाहिरात

**एमएसआरएलएम/गों/एचआर/ ५७ /२०१४ दिनांक ०२/०८/२०१४**

ग्रामीण भागातील दारिद्र्य निर्मुलन करण्यासाठी केंद्र शासनाने ग्रामीण विकास मंत्रालयाच्या माध्यमातून व जागतिक बँकेच्या अर्थ सहाय्याने राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची सुरुवात केलेली आहे. या अभियानाच्या माध्यमातून गरीबांचे आर्थिक व सामाजिक समावेशन करणे तसेच गरीबांनी, गरीबांसाठी व गरीबांच्या स्वयंचलित आणि शाश्वत संस्था उभ्या करणे हे या अभियानाचा मुख्य उद्देश आहेत.

या उद्देशपूर्तीसाठी महाराष्ट्र शासनाने ग्रामविकास विभागांतर्गत संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची स्थापना केलेली आहे. अभियानाच्या प्रभावी अमंलबजावणीसाठी जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, गोंदिया व तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष, अर्जुनी मोरगाव येथील खालील पदे कंत्राटी पध्दतीने ११ महिन्याच्या करार तत्वावर खालील पदे भरावयाची आहेत.

| अ. क्र. | पदाचे नाव | पद संख्या | स्तर | अर्हता व अनुभव | मानधन |
|---|---|---|---|---|---|
| १. | लेखा व प्रशासन सहाय्यक (Admin and Account Assistant) | १ | तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष | अर्हता - मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी धारण करीत असतील याबाबतीत लेखा परिक्षा हे विषय घेवुन वाणिज्य शाखेंतील पदवी/पदव्युत्तर पदवी व MS-CIT उत्तीर्ण आवश्यक<br>अनुभव - किमान ३ वर्षे लेखाविषयक कामाचा अनुभव | दरमहा रु १५०००/- मानधन |
| २. | लिपीक (Clerk) | १ | जिल्हा व तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष | अर्हता - माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण १) इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि.२) मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि.उत्तीर्ण व MS-CIT उत्तीर्ण आवश्यक<br>अनुभव - किमान ३ वर्षे लेखाविषयक कामाचा अनुभव | दरमहा रु १००००/- मानधन |
| ५. | डेटा एन्ट्री ऑपरेटर (Data Entry Operator) | २ | | अर्हता - माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण १) इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि.२) मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि.उत्तीर्ण व MS-CIT उत्तीर्ण आवश्यक<br>अनुभव - किमान ३ वर्षे डेटा एन्ट्री ऑपरेटर (संगणक परिचालन) कामाचा अनुभव | दरमहा रु १००००/- मानधन |

वरील पदांच्या कामाचे स्वरुप व ऑनलाईन अर्जाचा नमुना www.jobs.msrlm.org आणि www.umed.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला आहे. **तरी वरील प्रमाणे अर्हता धारण करणा-या इच्छूक उमेदवारांनी ऑनलाईन उपलब्ध करुन दिलेल्या अर्जाच्या नमुन्यात आवश्यक साक्षांकीत कागदपत्रासह आपला अर्ज दिनांक १३ /०८ / २०१४ रोजी पर्यत कार्यालयीन वेळेत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया तथा जिल्हा अभियान संचालक, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सेल टॅक्स कॉलोनी, फुलचुर, गोंदिया या पत्यावर कार्यालीयन वेळेत सादर करावा.** वरील पदांचे कर्तव्ये व जबाबदा-या www.jobs.msrlm.org उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. पदसंख्येत बदल, पात्रतेच्या निकषात बदल करण्याचे तसेच कोणतीही सूचना न देता प्रकिया रद्द करण्याचे सर्व अधिकार जिल्हा अभियान संचालक, तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांच्याकडे राखीव ठेवण्यात आले आहेत. निवड प्रकियेचे वेळपत्रक खालील प्रमाणे असेल. वयोमर्यादा :- अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांकाला वयोमर्यादा किमान २१ वर्षे, कमाल ३३ वर्षे. मागासवर्गीय उमेदवाराच्या बाबतीत कमाल ३८ वर्षे राहील.

| अ.क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १. | अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख | १३ ऑगष्ट २०१४ |
| २. | प्राप्त अर्जाची छननी व निवड प्रकियेसाठी पात्र उमेदवारांची यादी संकेतस्थळावर प्रसिध्द | १९ ऑगष्ट २०१४ |
| ३. | उमेदवारांकडून हरकती मागविणे | २२ ऑगष्ट २०१४ |
| ४. | निवड प्रकियेसाठी पात्र उमेदवारांची यादी सेकंतस्थळावर प्रसिध्द करणे | २५ ऑगष्ट २०१४ |
| ५. | लेखी परिक्षेचे आयोजन | ३१ ऑगष्ट २०१४ |
| ६. | लेखी परिक्षेचा निकाल जाहिर करणे | १ सप्टेंबर २०१४ |
| ७. | मुलाखतीचे आयोजन | ४ सप्टेंबर २०१४ |
| ८. | अंतिम निकाल जाहीर करणे | ५ सप्टेंबर २०१४ |

स्वा/-
जिल्हा अभियान संचालक, तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया
महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, गोंदिया.